# शास्त्रीनगर रुग्णालयातही लसीकरणाला सुरुवात



लस घेण्यासाठी सोशल डिस्टन्सिंग ठेवून लावलेली रांग. (छाया : आनंद मोरे)

लोकमत न्यूज नेटवर्क

**डोंबिवली :** शहरातील केडीएमसीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात शनिवारी कोरोनाच्या लसीकरणाला प्रारंभ झाला. यावेळी या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष केम्भवी यांना पहिला डोस देण्यात आला.

शास्त्रीनगर रुग्णालयातील पहिल्या मजल्यावरील केंद्रात सकाळी १०.३० च्या सुमारास लसीकरणाला सुरुवात झाली. त्यावेळी केडीएमसीच्या साथरोग नियंत्रण विभागाच्या प्रमुख डॉ. प्रतिभा पानपाटील, वैद्यकीय अधिकारी, रुग्णालयातील कर्मचारी आदी उपस्थित होते.

डॉ. केम्भवी आणि इंडियन मेडिकल असोसिएशनच्या डॉ. वंदना धाकतोडे यांना यावेळी कोविशिल्ड ही लस देण्यात आली. त्यानंतर दोघांनाही रुग्णालयातच अर्धा तास निरीक्षणासाठी थांबवण्यात आले. कोणताही साइड इफेक्ट न जाणवल्याने त्यांनी काही वेळातच कामाला सुरुवात केली. कोरोनाच्या लसीकरणासाठी पहिल्या टप्प्यात आपली निवड झाल्याबद्दल डॉ. केम्भवी यांनी आनंद झाल्याचे 'लोकमत'ला सांगितले.

शास्त्रीनगर रुग्णालयातील १०० आरोग्य सेवकांना दिवसभरात ही लस देण्यात आल्याचे डॉ. पानपाटील म्हणाल्या. सध्या ज्यांना लस दिली जात आहे, त्यांना २८ दिवसांना पुन्हा डोस द्यावा लागणार आहे. लसीकरणाची मोहीम वेगाने पूर्ण करण्यासाठी एकऐवजी तीन केंद्रेही सुरू करण्यात येतील. आता केडीएमसी हद्दीतील कोरोना रुग्णांची संख्या आटोक्यात येत आहे. परंतु तरीही नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. मास्क लावणे, नियमित हात धुणे, गर्दी टाळणे गरजेचे आहे, असे त्या पुढे म्हणाल्या.